# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१६** **दिनांक - १९/०१/२०२४**

## जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फायरींग करुन, फरार आरोपीतांना मुंबई व सुरत-गुजरात येथुन अटक, विरार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दि.१५/०१/२०२४ रोजी पहाटे ०३:३०वा.चे सुमारास तक्रारदार हे त्यांचे आशियाना अपार्टमेंट, मन्सुरी नगर, गोपचरपाडा, विरार(पु.), येथील राहते घरी झोपलेले असतांना, कोणीतरी अज्ञात इसमांनी त्यांचे रुमचा दरवाजा ठोठावुन 'अम्मी की तब्बेत ठिक नही है । दरवाजा खोलो' असा आवाज देत असतांना, तक्रारदार यांचे पत्नीने त्यांस 'कोण है बाहर' असे विचारले असता, बाहेरुन प्रतिसाद न मिळाल्याने, तक्रारदार यांच्या पत्नीने तक्रारदार यांस 'शायद चोर होंगे' असे बोलुन दरवाजा उघडला नाही म्हणुन तक्रारदार यांना जिवेठार मारण्याच्या उद्देश्याने दरवाजा ठोठावणाऱ्या अनोळखी आरोपीतांनी त्याचे जवळील गावठी कट्टयाने तक्रारदार यांचे दिशेन गोळीबार केले बाबत तक्रारदार-मोबीन असमत शेख वय ४२ वर्षे ,रा.आशियाना अपार्टमेंट, मन्सुरी नगर, गोपचरपाडा, विरार(पु.), ता.वसई यांचे तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे, गु.रजि.नं. । ३०/२०२४, भा.दं.वि.सं. कलम- ३०७ सह भारतीय शस्त्र अधिनियम-१९५९ चे कलम ३, २५, २७ प्रमाणे दि.१५/०१/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाची माहिती मिळताच लागलीच विरार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी भेट देवुन, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ यांचे आदेशान्वये व मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली चार वेग-वेगळी पथके तयार करुन, घटनास्थळी मिळालेले प्रत्यक्षदर्शी, सीसीटीव्ही फुटेज, तसेच इतर माहितीचे आधारे, नमुद गुन्हयातील अनोळखी आरोपीतांनी गुन्हा करण्यासाठी ॲक्टीव्हा मोटर सायकलचा वापर केल्याचे दिसुन आल्याने, सदर मोटर सायकलचा मागोवा घेत असतांना, नमुद गुन्हयातील अनोळखी आरोपीतांपैकी एक आरोपी पळुन जाण्याच्या तयारीत असतांना, आरोपीत-१)मोहित ठाकुर, रा.नालासोपारा पुर्व, यास अंधेरी-मुंबई येथे शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपीताकडे चौकशी केली असता, त्यास मस्तान शेख याने १ लाख रुपयांस तक्रारदारास जिवे ठार मारण्याची सुपारी दिल्याने, त्याचे इतर दोन साथीदारांचे साथीने तक्रारदार यास मारण्याचा प्रयत्न केल्याची माहिती दिली. त्यानंतर तांत्रिक व गुप्त बातमीदारांचे आधारे मिळालेल्या माहितीद्वारे आरोपी नामे.२)मस्तान शेख, वय-३९ वर्षे, व ३)अजय ठाकुर, वय-२१ वर्षे, दोन्ही रा.नालासोपारा पुर्व यांस सुरत-गुजरात येथे सापळा रचुन, शिताफिने पाठलाग करुन ताब्यात घेतले आहे. वरिल तिन्ही आरोपीतांना नमुद गुन्हयात अटक केली असुन, त्यांचेकडून **०१ गावठी कट्टा, ०२ जिवंत काडतुस, १ खाली केस, ०२ सुरे, ०१ मोटर सायकल असा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचा अधिक तपास पोनि/अभिजित मडके हे करत आहेत.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.विजय पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.अभिजित मडके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे

सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/सचिन लोखंडे, संदिप जाधव, हर्षद चव्हाण, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, दत्तात्रय पगार, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, तसेच पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, कार्यालयाचे पोहवा/नामदेव ढोणे, व पोअं/संतोष खेमनर, यांनी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

